# दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि.,

मुख्य कार्यालय : मोंढा, परळी-वैजनाथ जि.बीड-४३१ ५१५

रजिस्ट्रेशन नंबर : बीएचआर/बीएनके/बी १०६ दि.२४.२.१९६६

## नोटीस

(केवळ भागधारकांसाठी)

## ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि., परळी वैजनाथच्या सर्व भागधारक सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक १७.०९.२०२३ रोजी सकाळी ठिक १० वाजता वैद्यनाथ प्रतिष्ठाण, परळी-वैजनाथ येथे खालील विषयांचा विचार करण्यासाठी भरणार आहे. तरी सर्व भागधारकांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस अगत्यपूर्वक हजर रहावे ही विनंती.

**-: सभेपुढील विषय :-**

विषय क्र. १ : मागील दि.११/०९/२०२२ रोजी झालेल्या ५७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

विषय क्र. २ : सन २०२२-२०२३ अखेर वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक संमत करणे.

विषय क्र. ३ : मा.संचालक मंडळाने मंजूर केलेल्या सन २०२२-२०२३ सालच्या नफावाटणीस अनुसमर्थन देणे.

विषय क्र. ४ : सन २०२२-२०२३ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्तीच्या खर्चास मंजूरी देणे व सन २०२३-२०२४ सालाचे मा.संचालक मंडळाने मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकास अनुसमर्थन देणे.

विषय क्र. ५ : सन २०२२-२०२३ वर्षाच्या लेखापरिक्षणाची माहिती घेणे व सन २०२२-२०२३ वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.

विषय क्र. ६ : मा.संचालक मंडळाचे मान्यतेनुसार सन २०२३-२०२४ वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षक यांच्या नेमणुकीस मान्यता देणे व मा.वैधानिक लेखापरीक्षकांचा मेहेनताना ठरविण्याचे अधिकार मा.संचालक मंडळास देणे.

विषय क्र. ७ : बँकेच्या प्रचलित पोटनियमामध्ये मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या दुरुस्ती व नव्याने समाविष्ट केलेल्या पोटनियमास मान्यता देणे बाबत.

विषय क्र. ८ : सन २०२२-२०२३ या अर्थिक वर्षात संचालक मंडळाने कर्जातील व्याज, दंडव्याज व इतर वसुली खर्चास, तसेच एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत दिलेल्या सवलतीस मान्यता देणे.

विषय क्र. ९ : संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

विषय क्र. १० : संचालक मंडळाने शिफारस केलेल्या बँकेचा लाँग टर्म पर्सपेक्टीव्ह प्लॅनला मान्यता देणे.

विषय क्र.११ : ५८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.

विषय क्र.१२ : मा.अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळी आलेल्या विषयांचा विचार करणे.

मा.अध्यक्ष व संचालक मंडळाच्या आदेशानुसार

स्थळ : परळी-वैजनाथ

दिनांक : २३-०८-२०२३

(विनोद खर्चे)
मुख्य कार्यकारी अधिकारी

**-: सभासदांना नम्र सूचना :-**

१. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी ज्या सभासदास सभेपुढे असलेल्या विषयाबद्दल कांही माहिती विचारावयाची असेल त्यांनी दि.०९.०९.२०२३ पर्यंत मुख्य कार्यालयास लेखी कळवावे, अन्यथा त्याचा विचार केला जाणार नाही.

२. गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच दिवशी, त्याच ठिकणी सकाळी १०.३० वाजता होईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

३. ज्या सभासदांची भाग खरेदी संख्या ८० पेक्षा कमी असेल त्यांनी एकूण ८० भाग (रू.२,०००/-चे) खरेदी करणे पोटनियमाप्रमाणे अत्यावश्यक आहे.

४. बँकेचा संपूर्ण अहवाल बँकेच्या संकेत स्थळावर (www.vaidyanathbank.com) उपलब्ध असून सभासदांसाठी अहवालांच्या प्रती बँकेच्या शाखांकडेही उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

५. सभासदांना नांव, पत्ता, मोबाईल क्रमांक अथवा वारस नोंद बदल करावयाचा असल्यास त्याची बँकेच्या शाखेमार्फत बँकेच्या नोंदणीकृत कार्यालयातील शेअर्स विभागात नोंद करुन घ्यावी. (सभासदांनी आपला व्हॉट्सॲप असलेला मोबाईल क्रमांक बँकेत द्यावा.)

६. सभेची नोटीस बँकेचे मुख्य कार्यालय, मुख्य शाखेसह सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

७. सभेस उपस्थित असलेल्या सभासदांनी आपले उपस्थिती प्रमाणपत्र घेऊन जावे.